अधिकारी घडविणारी विश्वसनीय संस्था

# स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

UPSC /MPSC /BANKING / SSC

Director : Dr. Vilas S. Gajghate 9923262977

प्रश्नप्रत्रिका क्रमांक

***BOOKLET NO.*** 202303

**2023**

Code : 03

## संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब व गट क)

सामान्य क्षमता चाचणी

वेळ : 1 (एक) तास

Paper No. 3

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा क्रमांक ह्या चौकोनात न विसरता बॉलपेनने लिहावा.

परीक्षा - क्रमांक [ | | | | | | | | ]

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नप्रत्रिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईनेचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(क) मराठी व इंग्रजी आकलनावरील प्रश्न अनुक्रमे फक्त मराठी व फक्त इंग्रजी भाषेत असतील.

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणारा नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे. पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नूमद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) (अ) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत".**

(ब) "Decision Making & Problem Solving" वरील प्रश्नांच्या चुकीच्या उत्तरांसाठी गुण वजा केले जाणार नाहीत. **प्रस्तुत प्रश्न वगळून प्रश्नपत्रिकेतील उर्वरित प्रश्नांकरिता उमेदवारांनी सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील.**

### ताकीद (नमूना)

ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणतयाही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिध्द करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम - ८२" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/ किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुध्दा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुध्द उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK.

# परीक्षार्थींचे स्व-आकलन

## ✦ संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब व गट क) ✦

| अ.क्र. | विषयाचे नाव | एकूण प्रश्न | मी सोडवलेले प्रश्न | बरोबर | चुक | कोणत्या घटकावर चुकले | चुकलेल्या घटकासाठी अभ्यासाचे केलेले नियोजन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | राज्यव्यवस्था | | | | | | |
| 2. | अर्थव्यवस्था | | | | | | |
| 3. | इतिहास | | | | | | |
| 4. | भुगोल | | | | | | |
| 5. | सा. विज्ञान | | | | | | |
| 6. | गणित व बुध्दीमत्ता | | | | | | |
| 7. | चालू घडामोडी | | | | | | |

📖 ✍ मी अशी खात्री देतो की चुकलेल्या घटकावरती अभ्यास करुन भविष्यात त्या चुका टाळेल.

**कच्च्या कामासाठी जागा / Space For Rough Work.**

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

1 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**
अ) 'न्या. उदय उमेश लळित' यांची 10 ऑगस्ट 2022 रोजी भारताचे 49 वे सरन्यायधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
ब) 'न्या. उदय उमेश लळित' हे रत्नागिरी जिल्ह्यातील मुळचे रहिवाशी आहेत.
क) 'न्या. उदय उमेश लळित' यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठातून शिक्षण पुर्ण करुन जेष्ठ विधीश सोराबजी यांच्या सोबत काम केले.
**पर्यायी उत्तरे :**
1) फक्त अ आणि ब विधाने योग्य आहेत. 2) फक्त अ विधान योग्य आहे.
3) फक्त ब आणि क विधाने योग्य आहेत. 4) फक्त क विधान योग्य आहे.

2 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**
अ) राज्य सांस्कृतिक पुरस्कारांतर्गत तमाशा लोककला पुरस्कार देण्यात येणार असून 'सुरेखा पुणेकर' असे पुरस्काराचे नाव राहणार आहे.
ब) किर्तन / समाज प्रबोधन पुरस्कार हा पुरस्कार ह.भ. प. शिवराज उर्फ रामदास महाराज जाधव' या नावाने दिला जाणार आहे.
**पर्यायी उत्तरे :**
1) फक्त अ विधान योग्य आहे. 2) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत.
3) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य नाहीत. 4) फक्त ब विधान योग्य आहे.

3 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**
अ) 10 ऑगस्ट 2022 रोजी जागतिक जैवइंधन दिनाच्या निमित्ताने हरियाणातील पानिपत येथे इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या रिफायनरीमधील 2 जी थेनॉल प्रकल्प देशास अर्पण करण्यात आला आहे.
ब) दरवर्षी सुमारे 5 कोटी लिटर इथेनॉल तयार करण्यासाठी सुमारे 7 लाख टन पीक - अवशेष वापरण्याचे या प्रकल्पाचे उद्दीष्ट आहे.
**पर्यायी उत्तरे :**
1) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत. 2) फक्त अ विधान योग्य आहे.
3) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य नाहीत. 4) फक्त ब विधान योग्य आहे.

4 **15 ऑगस्ट 2022 रोजी केंद्र सरकारने पुढील 25 वर्षात भारताला विकसित राष्ट्र बनविण्यासाठी पंचप्राण लक्ष्य (पाच संख्या) निश्चित केले. त्यामध्ये कोणत्या संकल्पाचा समावेश नाही ?**
अ) विकसित भारताचे मोठे संकल्प घेऊन पुढे वाटचाल करा. ब) दास्यत्वाच्या सर्व खुणा पुसन टाका.
क) महिला सशक्तीकरण आणि सदृढ बालक. ड) भारताच्या वारशाचा अभिमान बाळगा.
इ) ऐक्याची ताकद. ई) पंतप्रधान व मुख्यमंत्री यांच्यासह नागरिकांची कर्तव्य.
**पर्यायी उत्तरे :**
1) फक्त अ ब आणि क या पंचप्राण लक्ष्याचा समावेश होत नाही. 2) फक्त ड या पंचप्राण लक्ष्याचा समावेश होत नाही.
3) फक्त क या पंचप्राण लक्ष्याचा समावेश होत नाही. 4) फक्त ड आणि ई या पंचप्राण लक्ष्याचा समावेश होत नाही.

5 **मध्यप्रदेशातील 'दखीनचा राजा' म्हणून प्रसिध्द असलेला ------ हा देशातील पहिला प्रमाणित 'हर घर जल' जिल्हा ठरला आहे.**
1) इंदूर 2) भोपाळ 3) जबलपूर 4) बुरहानपूर

6 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**
अ) गुगलने भारताच्या स्वातंत्र्याची 75 वर्ष साजरी करण्यासाठी 'इंडिया की उडान' प्रकल्प ऑगस्ट 2022 मध्ये सुरु केला आहे.
ब) भारतव्यापी उत्सवाचा भाग म्हणून गुगलने सांस्कृतिक मंत्रालयासोबत सहकार्याची घोषणा केली आहे.
**पर्यायी उत्तरे :**
1) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत. 2) फक्त विधान अ योग्य आहे.
3) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत. 4) फक्त विधान ब योग्य आहे.

7 **'नेथन्ना विमा योजना' खालीलपैकी कोणत्या राज्याने सुरु केली आहे ?**
1) आंध्रप्रदेश 2) तेलंगणा 3) केरळ 4) तामिळनाडू

8 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**
अ) तामिळनाडूतील 'राजीव गांधी कॅन्सर इन्स्टिट्युट अँड रिसर्च सेंटर' येथे 'एस एस आय - मंत्रा' नामक देशातील पहिली मेडइन - इंडिया सर्जिकल रोबोटिक सिस्टीम स्थापित करण्यात आली.
ब) जगप्रसिध्द रोबोटिक कार्डियाक सर्जन डॉ. सुधीर पी. श्रीवास्तव यांच्या सहकार्याने हे मशीन तयार करण्यात आले आहे.
**पर्यायी उत्तरे :**
1) फक्त अ विधान योग्य आहे. 2) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत.
3) विधान अ आणि ब दोन्ही योग्य आहेत. 4) फक्त ब विधान योग्य आहे.

9 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

अ) भारताकडून 'मलेशिया' या देशाला 'तेजस' लढाऊ विमानांचा पुरवठा केला जात आहे.

ब) भारत मलेशियाला एकूण 29 'तेजस' लढाऊ विमाने पुरवणार आहे.

क) 'तेजस' लढाऊ विमाने वजनाने जड असलेली ही खास भारतीय बनावटीची विमाने आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

1) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत. 2) फक्त अ विधान योग्य आहे.

3) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य नाहीत. 4) फक्त ब विधान योग्य आहे.

10 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

अ) भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (ISRO) 30 जून 2022 रोजी श्रीहरीकोटा येथील सतिश धवन अंतराळ केंद्रातून DS - EO उपगृह प्रक्षेपित केला होता.

ब) DS - EO हा उपगृह यायलंडचा उपगृह म्हणून ओळखला जातो.

क) DS - EO या उपगृहाचे वजन 365 किलो आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधाने अ आणि क योग्य आहेत. 2) फक्त विधाने अ आणि ब योग्य आहेत.

3) फक्त विधाने ब आणि क योग्य आहेत. 4) फक्त विधान ब योग्य आहे.

11 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

अ) 'गीता गोपीनाथ' या हार्वर्ड विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात आंतरराष्ट्रीय अभ्यास आणि अर्थशास्त्राच्या प्राध्यापिका होत्या.

ब) शिकागो विद्यापीठाच्या 'बुथ स्कूल ऑफ बिझनेसमध्ये' 'गीता गोपीनाथ' या अर्थशास्त्राच्या सहाय्यक प्राध्यापिका होत्या.

क) गीता गोपीनाथ सन 2015 ते 2022 पर्यंत आंतरराष्ट्रीय नाणे निधी च्या प्रमूखअर्थतज्ञ म्हणून काम करत होत्या.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधाने अ आणि क योग्य आहेत. 2) फक्त विधान ब योग्य आहे.

3) फक्त विधाने अ आणि ब योग्य आहेत. 4) फक्त विधाने ब आणि क योग्य आहेत.

12 **'आचार्य अत्रे पत्रकारिता पुरस्कार' 2022 चा खालीलपैकी कोणाला देण्यात आला आहे ?**

1) डॉ. गो. बं. देगलुरकर 2) सलील कुलकर्णी 3) सुमेधा चिथडे 4) श्रीराम जयसिंगराव

13 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

अ) 'जागतिक प्रथमोपचार दिन' 11 सप्टेंबर रोजी साजरा केला जातो.

ब) सन 2022 च्या जागतिक प्रथमोपचार दिनायी थीम आजीवन प्रथमोपचार (life long First Aid) ही होती.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधान अ योग्य आहे. 2) फक्त विधान ब योग्य आहे.

3) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत. 4) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य नाहीत.

14 **भारतातील पहिला 'उन्नत शहरी द्रुतगती मार्ग' (Elevated Urban Expressway) - 'व्दारका' हा 2023 मध्ये कार्यान्वित होणार आहे. हा द्रुतगती मार्ग कोणत्या दोन राज्यां / केंद्रशासित प्रदेशांदरम्यान बांधला जात आहे ?**

1) दिल्ली - उत्तर प्रदेश 2) दिल्ली - हरियाणा 3) उत्तर - प्रदेश 4) हिमाचल प्रदेश - उत्तराखंड

15 **खालीलपैकी कोणत्या राज्याच्या सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग (MSMEs) विभागला 'MSME' क्षेत्राच्या संवर्धन आणि विकासामध्ये उत्कृष्ट योगदानासाठी राज्ये / कें. प्र. चा राष्ट्रीय MSME पुरस्कार 2022' या श्रेणीतील प्रथम पुरस्कार जून 2022 मध्ये प्रदान करण्यात आला ?**

1) महाराष्ट्र 2) ओडिशा 3) तेलंगणा 4) गुजरात

16 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधानाने ओळखा.**

(अ) सर्वोच्च किंवा उच्च न्यायालय 'एखादा खटला कनिष्ठ न्यायालय किंवा न्यायाधिकाणामध्ये प्रलंबित असेल तर, तो खटला वरिष्ठ न्यायालयाकडे वर्ग करण्यासाठी किंवा खटल्यातील त्यांचा आदेश रद्द करण्यासाठी वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयास किंवा व्यायाधिकारणास जो आदेश देतो त्यास 'परमादेश' (रिट् ऑफ मॅंडामस) असे म्हणतात.

(ब) कनिष्ठ न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने आपल्या अधिकारक्षेत्राबाहेरील कामे करू नये किंवा नसलेले अधिकार क्षेत्र बळकावू नये म्हणून वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयाला किंवा न्यायाधिकारणाला 'प्रमिषेध' (रिट ऑफ प्रोहिबिशन) असा आदेश देने.

**पर्यायी उत्तरे**

(1) फक्त (अ) आणि (ब) विधाने योग्य आहेत. (2) फक्त (अ) विधान योग्य आहे.

(3) फक्त (ब) विधान योग्य आहे. (4) फक्त (अ) आणि (ब) विधाने अयोग्य आहेत.

17 **पी. सांबमूर्ती खटला (1987) च्या निकालानुसार मुळे संरचनेतील फरक सर्वोच्च न्यायालयाने ठरविल्याप्रमाणे भारतीय राज्यघटनेत कोणत्या घटकांना अधोरेखीत केले आहे.**

(अ) कायद्याचे राज्य. (ब) न्यायालयीन पुर्नविलोकलन.

(क) न्यायासाठी प्रभावी उपाययोजना. (ड) व्यक्तीला समान दर्जा व संधी.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त (अ) आणि (क) घटकांना अधोरेखित केले आहे. 2) फक्त (अ) आणि (ब) घटकांना अधोरेखित केले आहे.

3) फक्त (क) आणि (ड) घटकांना अधोरेखित केले आहे. 4) फक्त (ब) आणि (ड) घटकांना अधोरेखित केले आहे.

18 **पुढील विधाने विचारात घ्या.**

(अ) भारताने अमेरिकन अध्यक्षीय शासनव्यवस्थेच्या ऐवजी ब्रिटनप्रमाणे संसदीय शासनव्यवस्थेचा स्विकार केला आहे.

(ब) संसदीय शासनव्यवस्थेत मंत्रिमंडळाची निवड केवळ कार्यकारी मंडळाच्या सदस्यांकडून केली जाते.

**उपयोक्त विधानांपैकी बरोबर नसणारे विधान कोणते/ती आहे/त ?**

**पर्यायी उत्तरे**

1) केवळ (अ) 2) केवळ (ब) 3) दोन्ही 4) दोन्ही नाही.

19 **संसदेचे कनिष्ठ सभागृह अर्थात लोकसभेच्या सदस्यांना निवडून देण्यसाठी मतदाराचे वय किती वर्ष पुर्ण असायला हवे. ?**

**पर्यायी उत्तरे :**

1) 25 वर्षे 2) 21 वर्षे 3) 30 वर्षे 4) 18 वर्षे

20 **विधानसभा विसर्जित झाल्याने फक्त विधानसभेत प्रलंबित असलेले विधेयक लोपपावते , मात्र विधान परिषदेत प्रलंबित असलेले विधेयक लोप पावत नाही. या विधानाबाबत.**

1) हे विधान पुर्णत: चुकीचे आहे. 2) हे विधान पुर्णत: बरोबर आहे.

3) हे विधान अशत: चुकीचे आहे. 4) हे विधान अशत: बरोबर आहे.

21 **पुढील विधाने अभ्यासा, व योग्य विधान/ने निवडा.**

(अ) जिल्हा परिषदेच्या अध्यक्षास प उपाध्यक्षास पगार राज्य शासनाच्या ग्रामविकास मंत्रालयाकडून मिळतो.

(ब)जिल्हा निधी खर्च करण्यासाठी उपजिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ योग्य 2) ब योग्य 3) अ, ब दोन्ही योग्य 4) अ, ब दोन्ही अयोग्य

22 **पुढील विधाने अभ्यासा, व योग्य विधान/ने ओळखा.**

(अ) वंसतराव नाईक समीतीने पंचायतराज बद्दल 226 शिफारशी सादर केल्या.

(ब) ल. ना. बोंगिरवार समितीने पंचायत राज बद्दल 158 शिफारशी सादर केल्या.

(क) पी. बी. पाटील समीतीने 202 शिफारशी सादर केल्या.

पर्यायी उत्तरे

1) केवळ अ 2) केवळ ब, क 3) केवळ अ, क 4) वरील सर्व

23 **पुढील विधाने अभ्यासून योग्य पर्याय निवडा.**

(अ) भारतात सर्वप्रथम नागरी स्थानिक संस्था कलकत्ता येथे स्थापन करण्यात आली.

(ब) महाराष्ट्रातील पहिली महागरपालिका मुंबई येथे 1860 साली स्थापन करण्यात आली.

**पर्यायी उत्तरे**

1) अ योग्य, ब अयोग्य 2) ब योग्य, अ योग्य 3) दोन्ही योग्य 4) दोन्ही अयोग्य

24 **पुढील विधाने अभ्यासा, व योग्य विधान/ने निवडा.**

(अ) बोंगिरवार समिती महाराष्ट्र् शासनाने 2 एप्रिल 1970 रोजी नेमली.

(ब) या समितीने 202 शिफारशी केल्या.

(क) या समितीने संसद व विधीमंडळ सदस्य यांचा समावेश जिल्हा परिषदेवर करावा असे सुचविले.

(ड) या समितीने न्यायपंचायतीशी तरतूद रद्द करावी अशी शिफारस केली नाही.

**पर्यायी उत्तरे**

1) अ, ब 2) ब, क 3) अ,ड 4) वरील सर्व

25 **पुढील विधाने अभ्यासा व योग्य पर्याय निवडा.**
(अ) ग्रामसेवकाचा पगार ग्रामपंचायत संचित निधीतून देण्यात येतो. (ब) ग्रामपंचायतीचा सचिव या नात्याने तलाठी कार्य करतो.
**पर्यायी उत्तरे**
1) अ बरोबर, ब चूक 2) ब बरोबर, अ चूक 3) दोन्ही बरोबर 4) दोन्ही चूक

26 **भारताचे राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याचा पहिला प्रयत्न कोणत्या भारतीय व्यक्तीने केला होता ?**
1) गोपाल कृष्ण गोखले 2) दादाभाई नौरोजी 3) महात्मा गांधी 4) भारतीय नियोजन आयोग

27 **ग्लोबल डेटा लॅब ( Global Data Lab) या................ मधील गैर - सरकारी संस्थेमार्फत 'उपराष्ट्रीय मानव विकास निर्देशांक तसेच 'उपराष्ट्रीय लिंग विकास निर्देशांक' मोजले जातात.**
1) स्विट्झलॅंड 2) अमेरिका 3) नेदरलॅंड 4) जर्मनी

28 **भारताच्या 'पाचव्या पंचवार्षिक' योजनेबाबत योग्य विधानाने ओळखा.**
(अ) पाचवी पंचवार्षिक योजना ही एक वर्ष अगोदरच श्री मोरारजी देसाई सरकारने समाप्त केली होती.
(ब) पाचव्या पंचवार्षिक योजनेपासून नियोजनाचा भर स्पष्टपणे दारिद्र्यनिर्मूलनाकडून जड उदयोंगाकडे झुकला होता.
(क) पाचव्या पंचवार्षिक योजनेचा प्रस्ताविक खर्च 37,250 कोटी असून वास्तविक खर्च 49,712 कोटी इतका झाला होता.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त अ विधान योग्य आहे. 2) अ बरोबर, ब आणि क चूक
3) फक्त ब विधान योग्य आहे. 4) यापैकी नाही.

29 **ज्या वेळी व्याख्या व्यक्तीला आपल्या क्षमते पेक्षा/ कार्यक्षमतेपेक्षा शिक्षणाच्या दर्जा पेक्षा कमी प्रतीच्या रोजगारावर समाधान मानावे लागते, त्यावेळी तिला.................. बेरोजगारी असे म्हणतात.**
1) अदृश्य बेरोजगारी 2) चक्रीय बेरोजगारी
3) संरचनात्मक बेरोजगारी 4) कमी प्रतीची बेरोजगारी

30 **खालील विधानांचा विचार करून अयोग्य विधानाने ओळखा.**
(अ) सन 1921 ते 1951 हा भारताच्या वेगवान उच्च वाढीच्या लोकसंख्येचा काळ म्हणून ओळखला जातो.
(ब) सन 1921 ते 1951 या काळात भारताचा जन्म दर 48 प्रति हजारावरून केवळ 30 प्रति हजारापर्यंत घसरला होता.
(क) सन 1921 ते 1951 या काळातील लोकसंख्याच्या वाढीच्या काळास 'महाविभाजन काळ' असे देखिल संबोधले जाते.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त अ विधान अयोग्य आहे. 2) फक्त क विधान अयोग्य आहे.
3) वरील सर्व विधाने अयोग्य आहेत. 4) फक्त ब विधान अयोग्य आहे.

31 **तंत्रज्ञान प्रगतीबरोबरच ग्राहक तक्रारी हाताळण्यासाठी संख्यात्मक व्यवस्था प्रस्थापित करण्यात आली, त्यासाठी RBF ने जून 1995 मध्ये ............ही योजना सुरू केली होती.**
1) बॅंकिंग वसुली योजना 2) बॅंकिंग सिक्युरिटायझेशन योजना
3) मालमत्ता पुनबांधणी 4) बॅंकिंग लोकपाल योजना.

32 **'महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ' (महावित्त) याये कार्यक्षेत्र खालीलपैकी कोठे आहे?**
(अ) महाराष्ट्र (ब) गुजरात (क) गोवा (ड) मध्यप्रदेश (इ) दिव व दमण.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त अ, ब आणि क हे कार्यक्षेत्र आहते. 2) फक्त अ , क आणि इ हे कार्यक्षेत्र आहेत.
3) फक्त ब, ड आणि इ हे कार्यक्षेत्र आहते. 4) फक्त अ, ब आणि ड हे कार्यक्षेत्र आहते.

33 **आयात पर्यायी करणा-या धोरणाचे कोणते उद्दिष्ट्य नाही ?**
1) आयात वस्तुंना पर्यायी वस्तू भारतात निर्माण करणे. 2) परकीय चलनाची बचत करणे.
3) सर्व वस्तूंच्या उत्पादनाबद्दल स्वावलंबन प्राप्त करणे. 4) आयातीचे आकारमान कमी करण्याचा प्रयत्न करणे.

34 **पुढीलपैकी बरोबर विधान कोणते ?**
1) जी. डी. पी. मधील कृषी क्षेत्राचा हिस्सा कमी होणे ही नकारात्मक बाब आहे.
2) भारताची अर्थव्यवस्था सेवाधारित अर्थव्यवस्थेकडून कृषीधारित बनत आहे.
3) भारताच्या जी. डी. पी. मधील कृषी क्षेत्राचा हिस्सा कमी - कमी होत गेला.
4) वरीलपैकी एकही नाही.

35 **खालीलपैकी कोणत्या वर्षी तेलाच्या किमती प्रचंड प्रमाणात वाढल्या नाहीत ?**
1) 1973 2) 1969 3) 1991 4) 1979

36 **2011 च्या जनगणनेनुसार सर्वाधिक घनता असलेली पहिली तीन राज्ये कोणती ?**
1) बिहार, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल 2) बिहार, उत्तरप्रदेश, केरळ
3) बिहार, केरळ, उत्तरप्रदेश 4) बिहार, पश्चिम बंगाल, केरळ

37 **पुढील विधानांचा विचार करा.**
(अ) 1991 च्या नवीन औद्योगिक धोरणे 72% औद्योगिक क्षेत्र परवाना मुक्त करण्यात आले.
(ब) या धोरणाने केवळ 14 बाबींसाठी परवाना पद्धती चालू ठेवली. वरीलपैकी काय खरे नाही ?
**पर्यायी उत्तरे**
1) केवळ अ 2) केवळ ब 3) वरील दोन्ही 4) कोणतेही नाही

38 **पुढील विधाने अभ्यासा.**
(अ) ट्रेझरी बिले भारत सरकारमार्फत नियमित कालांतराने लिलावाद्वारे विकली जातात.
(ब) ट्रेझरी बिले ही वचन पत्राच्या स्वरूपात प्रचलित केली जातात.
(क) ट्रेझरी बिले त्यांच्या दर्शनी किमतीला वठणीवर विकले जातात.
(ड) ट्रेझरी बिले कोणताही व्यक्ती, व्यपारी बँका, कंपन्या, कार्पो रेट कंपन्या इत्यादी विकत घेऊ शकतात.
**वरीलपैकी काय खरे नाही ?**
**पर्यायी उत्तरे**
1) केवळ अ 2) केवळ ब 3) क व ड दोन्ही 4) कोणतेही नाही

39 **सरकारच्या जमा खर्चाच्या धोरणाला खालीलपैकी काय म्हणतात ?**
1) चलनविषयक धोरण 2) राजकोषीय धोरण 3) मौहिक धोरण 4) चलननिर्मिती

40 **नाफेडचे मुख्यालय पुढीलपैकी कोणत्या ठिकाणी आहेत ?**
1) मुंबई 2) नवी दिल्ली 3) बेंगलोर 4) हैदराबाद

41 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान/ने ओळखा.**
(अ) संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना 9 फेब्रुवारी 1955 मध्ये केली होती.
(ब) पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात केशवराव जेधे यांच्या अख्यक्षतेखाली 6 फेब्रुवारी 1956 रोजी सभा भरवली होती.
(क) एस. एम. जोशी हे संयुक्त महाराष्ट्र समितीचे उपाध्यक्ष होते.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त अ विधान योग्य आहे. 2) फक्त क विधान योग्य आहे.
3) अ आणि ब विधाने योग्य आहेत. 4) फक्त ब विधान योग्य आहे.

42 **1857 च्या उठावाच्या बाबतीत खालील विधानांचा विचार करा.**
(अ) दिल्ली येथील उठावाचे बहादुरशाह जफर हे नाममात्र प्रमुख होते. (ब) खरे नेतृत्व मात्र मुघल सेनापती इलाई बक्श यांच्याकडे होते.
**पर्यायी उत्तरे**
1) फक्त अ योग्य 2) ब योग्य 3) दोन्ही योग्य 4) अ, ब दोन्ही अयोग्य

43 **'नाशिक खटला 1910' या बाबत योग्य विधान / ने ओळखा.**
(अ) नाशिक खटला 1910 नुसार 'शंकर रामचंद्र सोमन आणि नारायण जोशी' या दोघांना मिस्टर जॅक्सनच्या खुनाबाबत आरोपी ठरवून जन्म ठेपेची शिक्षा दिली.
(ब) मिस्टर जॅक्सनच्या वधाचा संबंध ब्रिटिश सरकारने वि. दा. सावरकर यांच्या जोडला होता.
**पर्यायी उत्तरे**
1) विधान अ योग्य आहे. 2) विधान ब योग्य आहे.
3) विधाने अ आणि ब दोन्ही योग्य आहेत. 4) विधाने अ आणि ब दोन्ही अयोग्य आहेत.

44 **पुढील विधाने पाहा.**
(अ) 1931 साली कराची येथे काँग्रेस अधिवेशनात मूलभूत हक्क ठराव पारीत करण्यात आला.
(ब) पं. मोतीलाल नेहरु या अधिवेशनाचे अध्यक्ष होते.
**वरीलपैकी अयोग्य विधान निवडा.**
1) केवळ अ 2) केवळ ब 3) दोन्ही 4) दोन्ही नाही

45 **'चले जाव' चळवळीत पुण्यामध्ये अंदोलक लोकांनी खालीलपैकी कोणत्या मार्गाचा अवलंब केला होता.**

(अ) टेलीफोनच्या तारा जोडणे.
(ब) पोलिस चौक्या ताब्यात होणे व जाळणे.
(क) खनिजे लुटणे
(ड) पोस्ट कार्यालयास आग लावणे.

**पर्यायी उत्तरे**

1) अ आणि ब दोन्ही मार्गाचा अवलंब केला होता.
2) क आणि ड दोन्ही मार्गाचा अवलंब केला होता.
3) वरील सर्व मार्गाचा अवलंब केला होता.
4) अ, ब आणि ड मार्गाचा अवलंब केला होता.

46 **चंपारण्य येथील सत्याग्रहात भाग घेण्यासाठी महाराष्ट्रातू खालील दोन महिला गेल्या.**

(अ) अवंतिकाबाई गोखले (ब) आनंदी वैशंपायन (क) निर्मला म्हात्रे - (ड) अनुसया बेन

**पर्यायी उत्तरे**

1) अ व ब 2) ब व क 3) अ व क 4) अ व ड

47 **राष्ट्रीय कॉंग्रेसची अधिवेशने आणि काही ठळक घटना याबाबत योग्य जोड्या लावा.**

| **राष्ट्रीय कॉंग्रेसची अधिवेशने** | **काही ठळक घटना.** |
|---|---|
| (अ) कलकत्त अधिवेशन - (1906) | (1) पूर्ण स्वराज्याचा ठराव. |
| (ब) लखनौ अधिवेशन - (1916) | (2) हिंदू-मुस्लिम ऐक्यांचा करार |
| (क) लहोर अधिवेशन - (1929) | (3) स्वराज्याचा ठराव. |
| (ड) आवडी अधिवेशन - (1955) | (4) समाजवादी समाज रचनेचा ठराव. |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | 2 | 1 | 4 | 3 |
| 2) | 1 | 3 | 2 | 4 |
| 3) | 4 | 1 | 3 | 2 |
| 4) | 3 | 2 | 1 | 4 |

48 **ब्रिटीश सरकारने सोलापूर येथे 1930 ला लष्करी कायदा लागू केला व खालील व्यक्तींना फाशी दिली.**

(अ) मलाप्पा धनशेट्टी (ब) श्रीकृष्ण सारडा (क) शिवाजीराव पटवर्धन (ड) जगन्नाथ शिंदे

**पर्यायी उत्तरे**

1) अ, ब, क 2) ब, क, ड 3) अ, ब, ड 4) वरील सर्व

49 **नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी खालीलपैकी कोठे हिंदुस्तानचे हंगाम सरकार स्थापन केले ?**

1) जपान 2) कोहिमा 3) सिंगापूर 4) माऊडॉक्

50 **मोर्ले - मिंटो सुधारणा कायद्याने 1909 'आमचा सर्वनाश केला आहे' असे कोणी म्हटले आहे.**

1) महात्मा गांधी 2) डॉ. राजेंद्रप्रसाद 3) लोकमान्य टिळक 4) लाला लजपतराय

51 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) हिंदुस्तानास क्षय लागला आहे. हा प्रसिद्ध लेख गोपाळ गणेश आगारकर यांनी लिहीला होता.
(ब) गोपाळ गणेश आगारकर यांच्या सुधाकर या वृत्तपत्राचे इंग्रजी आवृत्तीचे संपादक गोपाळ कृष्ण गोखले हे होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधान (अ) योग्य आहे.
2) फक्त विधान (ब) योग्य आहे.
3) विधान (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत.
4) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहेत.

52 **महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी कोणाच्या प्रभावामुळे विधवा 'विवाहोत्तोजक मंडळीची' स्थापना वर्धा येथे केलेली होती.**

1) गोपाळ हरी देशमुख यांच्या प्रभाकर या वृत्तपत्रातील संपादकीय लेखामुळे
2) विष्णुशास्त्री पंडित यांच्या पुर्नविवाहहोत्तेजक मंडळी या संस्थेच्या प्रभावामुळे
3) पंडिता रमाबाई यांच्या शारदा सदन संस्थेच्या प्रभावामुळे
4) ताराबाई शिंदे यांच्या स्त्री पुरुष समानता या पुस्तकातील प्रसिद्ध लेखामुळे

53 **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'आहिल्या आश्रमाची' स्थापना कोठे केली होती ?**

1) वर्धा 2) पुणे 3) मुंबई 4) सातारा

54 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) राजर्षी शाहू महाराज यांनी इंग्लंडची राणी व्हिक्टोरीयाचा राज्यारोहण हिरक महोत्सव हे औचित्य साधून महारोग्यांसाठी उचगाव येथे एक वसाहत स्थापन केली होती.

(ब) राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानातील ब्रिटीशांचा राजनैतिक प्रतिनिधी म्हणुन कर्नल रे या अधिकाऱ्याची निवड केली.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधान (अ) योग्य आहे. 2) फक्त विधान (ब) योग्य आहे.
3) विधान (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहेत. 4) विधान (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत.

55 **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणत्या ठिकाणी भरलेल्या सत्याग्रह परिषदेमध्ये मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय घेतला होता ?**

1) नागपूर 2) माणगाव 3) येवला 4) महाड

---

56 **'धमनीची' प्रमूख वैशिष्टे खालीलपैकी कोणती आहेत.**

(अ) धमण्या शिरांपेक्षा खोलवर पसरलेल्या असतात.
(ब) धमण्यांना 'झडपा' असतात.
(क) साधारणत: रक्तदाब हा धमण्यापेक्षा कमी असतो.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त क विधान योग्य आहे. 2) फक्त ब विधान योग्य आहे.
3) फक्त अ विधान योग्य आहे. 4) अ आणि ब विधाने योग्य आहेत.

---

57 **एक ग्रॅम युरिक आम्लासाठी ---------- मिली पाणी लागते.**

1) 20 मिली 2) 17.5 मिली 3) 15 मिली 4) 10 मिली

---

58 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान/ने ओळखा.**

(अ) वृषण ही पुरूषाची जनन ग्रंथी म्हणून ओळखले जाते.
(ब) पुरूषातील युग्मक पेशीची निर्मिती ही वृषण मध्ये होते त्यास शुक्राणू पेशी असे म्हणतात.
(क) मानवी पुरूष वृषण मधील 'अधिस्तरपेशी' अर्धसुत्री पद्धतीने विभाजित होऊन शुक्राणू तयार होतात.

**पर्यायी उत्तरे**

1) वरील सर्व विधाने योग्य आहेत. 2) फक्त अ आणि ब दोन्ही विधाने योग्य आहेत.
3) फक्त अ आणि क दोन्ही विधाने योग्य आहेत. 4) फक्त क विधान योग्य आहे.

---

59 **'द्विनाम पद्धती' खालीलपैकी कोणत्या शास्त्रज्ञाने शोधुन काढील आहे.**

1) ऑर अॅरीस्टॉटल 2) कार्ल लिनीयस 3) टेविरॅनस 4) जॉन मार्टिन

---

60 **'टेरिडोफायटा' याबाबतच अयोग्य विधान / ने ओळखा.**

(अ) अबीजपत्रामधील सर्वात प्रगत व पृथ्वीवरील सर्वात पहिली संवहनी संस्था होय.
(ब) 'टेरिडोफायटा' वनस्पती प्रकारात फक्त युग्मकाद्वारे लैंगिक प्रजनन होते.
(क) सिलोफायटा, लायकोफायटा, आर्भोफायटा आणि फिलीकोफायटा असे चार प्रकारात टेरिडोफायटाचे वर्गीकरण केले जाते.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त क विधान अयोग्य आहे. 2) फक्त अ विधान अयोग्य आहे.
3) अ आणि क विधाने अयोग्य आहेत. 4) फक्त ब विधान अयोग्य आहे.

---

61 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) मुलद्रव्याच्या संयोग पावणाऱ्या क्षमतेला 'संयुजा' असे म्हणतात.
(ब) सोडियम या मुलद्रव्यात एकूण इलेक्ट्रॉन्स असतात.
(क) क्लोरिन या मुलद्रव्यात 17 इलेक्ट्रॉन संरूपण 2,10,5 अशा स्वरूपाचे आहे.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त विधाने अ आणि क योग्य आहेत. 2) फक्त विधाने अ आणि ब योग्य आहेत.
3) फक्त विधान अ योग्य आहे. 4) फक्त विधाने अ, ब आणि क योग्य आहेत.

---

62 **धातुला ठोकल्यामुळे न्याया पत्रा होतो या गुणधर्माला ----------- असे म्हणतात.**

1) वर्धनियता 2) तन्यता 3) कठिणपणा 4) नादमयता

---

63 **खालील विधानांचा विचार करा आणि योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) एकाच संयुगाचे अपघटन होऊन दोन किंवा दोनपेक्षा जास्त 'उत्पादित' तयार होतात त्यास 'अपघटन अभिक्रिया' असे म्हणतात.
(ब) '$CuSO_4 + Zn \longrightarrow ZnSO_4 + Cu$' हे अपघटन अभिक्रियाचे उदाहरण आहे.
(क) जेव्हा दोन किंवा अधिक पदार्थ एकत्र येऊन केवळ एकच उत्पादित मिळते तेव्हा त्या अभिक्रियेला संयोग अभिक्रिया असे म्हणतात.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त क  विधान योग्य आहेत. 2) फक्त अ आणि क विधाने योग्य आहेत.
3) फक्त अ आणि ब विधाने योग्य आहेत. 4) फक्त अ, ब आणि क विधाने योग्य आहेत.

64 **काचेचे प्रकार आणि त्याचे उपयोग यांच्या योग्य जोड्या लावा.**

| **काचेचे प्रकार** | **उपयोग** |
|---|---|
| (अ) पायरेक्स काच | (1) ऑप्टिकल उपकरणे. |
| (ब) क्राऊन काच | (2) प्रयोगशाळेतील उपकरणे. |
| (क) लीड - क्रिस्टलकाय | (3) आय - लेन्स. |
| (ड) क्रुक 'स' काच | (4) दागिने, शोभेचे भाडे. |

**पर्यायी उत्तरे**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | 2 | 4 | 3 | 1 |
| 2) | 4 | 1 | 3 | 2 |
| 3) | 2 | 1 | 4 | 3 |
| 4) | 3 | 1 | 2 | 4 |

65 **आम्ल याचे PH --------- ने ----------- पर्यंत असतो.**

1) 2 ते 7.9 2) 0.1 ते 5.2 3) 4 ते 7.8 4) 1 ने 6.9

66 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) जी राशी फक्त परिणामाच्या साहाय्याने दर्शविता येते त्यास 'सदिश राशी' संबोधले जाते.
(ब) 'अंतर आणि चाल' ही सदिश राशीची उदाहरणे आहेत.
(क) सदिश राशी दर्शविताना डोक्यावर बाण काढला जातो.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त क विधान योग्य आहे. 2) फक्त अ, ब आणि क विधाने योग्य आहेत.
3) फक्त ब विधान योग्य आहे. 4) फक्त अ विधान योग्य आहे.

67 **जर एखादी वस्तु पृथ्वीच्या पृष्ठभागापासून पृथ्वीच्या त्रिजेच्या आर्धी खोलीमध्ये नेली असता त्यावर असणारे गुरुत्वत्वरण काय असेल ? (g = 10 m/s2 घ्या)**

1) 0.5 $m/s^2$ 2) 3 $m/s^2$ 3) 5 $m/s^2$ 4) 2.7 $m/s^2$

68 **'भिंतीवरून ध्वनी तरंगाचे पुन्हा - पुन्हा परावर्तन होऊन ध्वनीतरंग एकत्र येऊन सतत जाणवेल असा ध्वनी तयार, त्याचा परिणाम ध्वनीचे सातव्या राहण्यात होतो त्यालाच ------------ म्हणतात.**

1) सोनार 2) निनाद 3) प्रतिध्वनी 4) वारंवारता

69 **प्रकाशाने अंगभूत रंगामध्ये विभक्तीकरण करण्याच्या नैसगिक घटनेस प्रकाशाचे ------------- म्हणतात.**

1) अपवर्तनांक 2) विकिरण 3) अपस्करण 4) निर्वात पोकळी

70 **एका उपकरणाचा रोध 120 Ω आहे. त्या उपकरणाच्या दोन टोकांमध्ये 27 TV विभवांतर प्रयुक्त केले. असता त्यातून वाहणारी विद्युतधारा 400 Ω रोध असणाऱ्या उपकरणातून जाऊ देण्यासाठी उपकरणाच्या दोन टोकांमध्ये किती विभवांवर प्रयुक्त करावे लागेल ?**

1) 0.5A,200V 2) 0.225A,90V 3) 0.125A,50V 4) 0.3A,150V

71 **अयोग्य जोडी ओळखा.**

1) पसरणीघाट - पुणे - महाड
2) अंबाघाट - कोल्हापुर - रत्नागिरी
3) बोर घाट - मुंबई - पुणे
4) करुळघाट - कोल्हापूर - गगनबावडा

72 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) कृष्णा नदीची भारतातील एकूण लांबी 1,400 कि.मी. इतकी असुन तिचा 282 कि.मी. लांबीचा प्रवाह महाराष्ट्रातून गेला आहे.
(ब) पंचगंगा ही नदी कुंभी, कासारी, तुळशी, भोगावती आणि सरस्वती या पाच नद्यांनी मिळून बनलेली आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधान (अ) योग्य आहे. 2) फक्त विधान (ब) योग्य आहे.

3) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहेत. 4) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत.

73 **फुले प्रगती (जे एल 24) ही खालीलपैकी कोणत्या पिकाची जात आहे ?**

1) सुर्यफुल 2) भुईमुग 3) हरभरा 4) वटाणा

74 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) मुंबई हे महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावरील एक नैसर्गिक बंदर असून त्याचे क्षेत्रफळ 400 चौ. कि. मी. आहे.

(ब) मुंबई बंदरावरील ताण कमी करण्यासाठी रायगड जिल्ह्यात न्हावासेवा बंदर, निर्माण करण्यात आले आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधान (अ) योग्य आहे. 2) फक्त विधान (ब) योग्य आहे.
3) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहेत. 4) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत.

75 **सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात लोकसंख्येची घनता किती चौ. कि. मी. होती ?**

1) 204 चौ. कि. मी. 2) 315 चौ. कि. मी. 3) 257 चौ. कि. मी. 4) 365 चौ. कि. मी.

76 **मुळशी तालुक्यातील 'अंबी' या मुठेच्या उपनदीवर पानशेत येथील जलाशयास कोणते नाव देण्यात आले आहे ?**

1) वीर बाजी पासलकर 2) तानाजी सागर 3) शिवाजी सागर 4) यशवंत सागर

77 **भारतातील पहिली टेलिग्राफ सेवा 5 नोव्हेंबर 1850 रोजी कोठे सुरु करण्यात आली होती ?**

1) चेन्नई 2) मुंबई 3) कलकत्ता 4) दिल्ली

78 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) कोकणचा सर्वच भाग एक सलग मैदान आहे.

(ब) कोकणचे मैदान किणाऱ्यापासून पूर्वेकडील सह्याद्रीच्या पायथ्यापर्यंत 250 मीटरपर्यंत वाढत जाते.

**पर्यायी उत्तरे :**

1) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहेत. 2) केवळ विधान (अ) योग्य आहे.
3) केवळ विधान (ब) योग्य आहे. 4) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत.

79 **नागपूर जिल्ह्याच्या मध्यभागात पश्चिमेकडून पूर्वेकडे कोणती टेकडी पसरलेली आहे ?**

1) रावणदेव टेकडी 2) नांदगाव टेकडी 3) चिंचगड टेकडी 4) गरमसूर टेकडी

80 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) ठाणे जिल्ह्यांत शहापुरमध्ये गरम पाण्याचा झरा आहे. याला स्थानिक स्तरावर शहापुरी असे संबोधले जाते.

(ब) पालीच्या अष्टविनायक गणपतीजवळ गरम पाण्याचा झरा असून याचे स्थान उन्हेरे गावाजवळ आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) केवळ विधान (ब) योग्य आहे. 2) केवळ विधान (ब) योग्य आहे.
3) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहेत. 4) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत.

81 **पेंच, नागपूर येथे असलेल्या राष्ट्रीय उद्यानास कोणत्या नावाने ओळखले जाते ?**

1) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान 2) इंदिरा गांधी राष्ट्रीय उद्यान
3) पंडित जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय उद्यान 4) श्यामाप्रसाद मुखर्जी राष्ट्रीय उद्यान.

82 **नाशिक जिल्ह्यातील खालीलपैकी कोणते जलसिंचनाचे प्रकल्प अपूर्ण राहीले आहेत ?**

(अ) सुपले (ब) चाणकपूर (क) पुणेगाव (ड) मुकणे

**पर्यायी उत्तरे :**

1) (अ), (ब) आणि (क) 2) (ब), (क) आणि (ड) 3) (अ), (ब) आणि (ड) 4) वरील सर्व

83 **जोड्या लावा.**

| | **प्रदेश** | | **गवताळ प्रदेशाचे नाव** |
|---|---|---|---|
| (अ) | युरेशिया | (i) | व्हेल्ड |
| (ब) | ऑस्ट्रेलिया | (ii) | प्रेअरी |
| (क) | आफ्रिका | (iii) | स्टेप्स |
| (ड) | उत्तरे अमेरिका | (iv) | डाउन्स |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(अ)** | **(ब)** | **(क)** | **(ड)** |
|---|---|---|---|---|
| 1) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

2) (iv) (iii) (ii) (i)
3) (iii) (iv) (i) (ii)
4) (iii) (iv) (ii) (i)

84 **महाराष्ट्रातील उत्तरेकडून दक्षिणेकडे असलेल्या किनाऱ्यालगत खाड्यांचा क्रम लावा.**
1) राजापुरीची खाडी, बाणकोटची खाडी, केळशाची खाडी, जयगडची खाडी
2) राजापुरीची खाडी, केळशाची खाडी, बाणकोटची खाडी, जयगडची खाडी
3) राजापुरीची खाडी, बाणकोटची खाडी, जयगडची खाडी, केळशाची खाडी
4) बाणकोटची खाडी, केळशाची खाडी, जयगडची खाडी, राजापुरीची खाडी

85 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**
(अ) सह्याद्रीच्या पायथ्यालगत सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी परिसरात सदाहरित अरण्ये पाहावयास मिळतात.
(ब) वार्षिक पर्जन्य सुमारे 200 सें.मी. किंवा त्यापेक्षा जास्त असणाऱ्या प्रदेशात व जांभा मृदेच्या भागात उष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये पाहावयास मिळतात.
**पर्यायी उत्तरे :**
1) फक्त (ब) योग्य आहे. 2) फक्त (अ) योग्य आहे.
3) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही योग्य आहे. 4) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत.

86 **बिंदू A हा बिंदू B च्या पूर्वेला 30 मीटर अंतरावर आहे. बिंदू C हा बिंदू A च्या दक्षिणेला 10 मीटर आहे. बिंदू D हा बिंदू C च्या पश्चिमेला 15 मीटर आहे. बिंदू E हा बिंदू D व F च्या अगदी मध्यभागी आहे. बिंदू D, E व F सरळ रेषेत आहेत. रेषाखंड DEF ची लांबी 20 मीटर आहे. बिंदू F हा बिंदू D च्या उत्तरेला आहे. बिंदू G हा बिंदू F च्या पूर्वेला 15 मीटरवर आहे. तर बिंदू G हा बिंदू G हा बिंदू A पासून किती अंतरावर व कोणत्या दिशेला आहे ?**
1) 10 मी, दक्षिण 2) 15 मी, उत्तर 3) 10 मी, उत्तर 4) 15 मी, दक्षिण

87 **एका घड्याळ दर तासाला 6 सेकंद पुढे जाते व दुसरे घड्याळ दर तासाला 6 सेकंद मागे पडते. सकाळी 8 वाजता घड्याळ बरोबर लावल्यास, दुसऱ्या दिवशी पहाटे 4 वाजता त्याच्यात किती फरक पडेल ?**
1) 0 मिनिटे 2) 2 मिनिटे 3) 4 मिनिटे 4) 120 सेकंद

88 **प्रश्नचिन्हाच्या जागी येणारे पद कोणते ?**
A1A, X2D, V6G, T21J, R88M, P445P, ?
1) N2676S 2) N2676T 3) T2670N 4) T2646N

89 **राधा व रमा या बहिणी आहेत. सरला व विमल याही बहिणी आहेत. सरलाचे वडील हे रमाचे भाऊ आहेत. तर विमल ही राधा हिची कोण?**
1) मावसबहीण 2) पुतणी 3) भाची 4) काकू

90 **प्रश्नचिन्हाच्या जागी कोणते - अक्षर येईल.**

| | | | |
|---|---|---|---|
| A | M | B | N |
| R | C | S | D |
| E | U | F | ? |

1) G 2) R 3) T 4) V

91 **रमेश आपल्या पत्नीपेक्षा 5 वर्षाने मोठा असून पत्नी तिच्या मुलाच्या 5 पट वयाची आहे. जर मुलाचे 3 वर्षांपूर्वीचे वय 4 वर्षे असेल तर रमेशचे आजचे वय किती ?**
1) 24 2) 25 3) 42 4) 40

92 **4 मीटर 95 cm, 9m व 16m, 65 cm या मापाचे कापडाचे तुकडे अचूक मोजण्यासाठी जास्तीत जास्त मोठ्या किती मापाची मोजपट्टी असायला हवी ?**
1) 47 cm 2) 45cm 3) 53 cm 4) 61 cm

93 **फळांच्या 3 करंड्यात आंबे, चिकू, केळी व पेरू ही फळे भरलेली आहेत. आंबे व केळी या फळांची संख्या समान आहे. चिकू केळीच्या दुप्पट आहेत. पेरूची संख्या चिकू व केळी मिळून होणाऱ्या संख्येच्या इतकी आहे. तीन करंड्यात मिळून 1000 फळे आहेत, तर त्यात पेरू व चिकू यांची संख्या किती ?**

1) 400    2) 398    3) 448    4) 320

94 **ताशी 54 km/hr वेगाने जाणारी एक रेल्वे 600 मीटर लांबीच्या पुलास 60 सेकंदात ओलांडते, तर तीच रेल्वे पुढे एका बोगद्यास 80 सेकंदात ओलांडते, तर त्या बोगद्याची लांबी काढा.**

1) 600 मीटर    2) 300 मीटर    3) 900 मीटर    4) 1200 मीटर


95 **एका फर्निचर विक्रत्याने काही फर्निचर रु. 21600 मध्ये विकले यामुळे त्याला 20% नफा मिळाला, तर फर्निचरची खेरीद किंमत किती होती ?**

1) 18000 रू    2) 1800 रू    3) 2875 रू    4) 7500 रू

96 **15 लीटर द्रावणात मीठ व पाणी असून त्यात 25% मिठाचे प्रमाणे आहे. हे द्रावण उन्हात ठेवल्यामुळे 3 लीटर पाण्याचे बाष्पीभवन झाले तर नवीन द्रावणात मिठाचे प्रमाण किती ?**

1) 25.31%    2) 31.25%    3) 75.32%    4) 36 %

97 **प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य संख्या लिहा.**




1) 12    2) 36    3) 24    4) 48

98 **दिलेल्या विधानांसाठी अनुमाने तपासा व योग्य पर्याय निवडा.**

विधान : सर्व बदक कोंबड्या आहेत.
कोणताही कावळा बदक नाही.

अनुमान : अ) काही कोंबड्या कावळे आहेत.
ब) सर्व कोंबड्या कावळे आहेत.
क) काही कोंबड्या बदक आहेत.
ड) काही कोंबड्या बदक नाहीत.

1) फक्त अनुमान अ, ब व क बरोबर    2) फक्त अनुमान अ व ब बरोबर
3) फक्त अनुमान क व ड बरोबर    4) सर्व बरोबर

99 **श्रीकांत मैदानात उत्तरेकडे तोंड करुन उभा होता. उजवीकडे वळून तो 30 किमी चालत गेला. त्यानंतर डावीकडे वळून त्याने 20 मी अंतर कापले. पून्हा उजवीकडे वळून तो 30 मी चालत गेला. पून्हा उजवीकडे वळून त्याने 45 मी. अंतर कापले व पून्हा एकदा उजवीकडेच वळून त्याने 45 मी. अंतर कापले. तर तो आता मुळ स्थानाच्या कोणत्या दिशेस आहे ?**

1) पूर्व    2) नैऋत्य    3) ईशान्य    4) आग्नेय

100 **रमेशचे वय सुरेशच्या वयाच्या दूपटीपेक्षा 2 ने जास्त आहे. कल्पनाचे वय रमेशच्या वयापेक्षा 5 ने जास्त आहे. कल्पनाचे वय 5 वर्षानंतर 30 वर्षे होईल. तर सुरेशचे आजचे वय किती ?**

1) 9    2) 10    3) 25    4) 22

## ALL THE BEST

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

## सूचना माहितीस्तव - (पृष्ठ 1 वरून पुढे ........)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यक्तिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे. असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम - 82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/ किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ सपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग - 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न (माहितीस्तव)

प्र. क्र. 101. **'गुलामगिरी' हे पुस्तक कोणी लिहले आहे ?**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर 2) गो.ग. आगरकर
3) महात्मा फुले 4) राजा राममोहन रॉय

ह्या प्रश्नाचे उत्तर "(3) महात्मा फुले " असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 101. ① ② ● ④

अशा पध्दतीने प्रस्तुत प्रश्नपुसस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर - क्रमांक तुम्हाला स्वतंत्र्यरीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्यात त्या प्रश्नपक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळया शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

## कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK.

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

अधिकारी घडविणारी विश्वसनीय संस्था

# स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

**UPSC/MPSC/BANKING/SSC**

**Director : Dr. Vilas S. Gajghate 9923262977**

**2023**

**Code : YO3**

## संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब व गट क)

सामान्य क्षमता चाचणी

वेळ : 1 (एक) तास

Paper No. 03

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

| Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | 2 | **26** | 2 | **51** | 4 | **76** | 2 |
| **2** | 4 | **27** | 3 | **52** | 3 | **77** | 3 |
| **3** | 2 | **28** | 1 | **53** | 2 | **78** | 3 |
| **4** | 2 | **29** | 4 | **54** | 3 | **79** | 4 |
| **5** | 4 | **30** | 3 | **55** | 1 | **80** | 2 |
| **6** | 3 | **31** | 4 | **56** | 3 | **81** | 3 |
| **7** | 2 | **32** | 2 | **57** | 4 | **82** | 4 |
| **8** | 4 | **33** | 3 | **58** | 1 | **83** | 3 |
| **9** | 2 | **34** | 3 | **59** | 2 | **84** | 1 |
| **10** | 1 | **35** | 2 | **60** | 4 | **85** | 3 |
| **11** | 3 | **36** | 4 | **61** | 2 | **86** | 3 |
| **12** | 4 | **37** | 3 | **62** | 1 | **87** | 3 |
| **13** | 3 | **38** | 1 | **63** | 2 | **88** | 1 |
| **14** | 2 | **39** | 2 | **64** | 3 | **89** | 3 |
| **15** | 2 | **40** | 2 | **65** | 4 | **90** | 4 |
| **16** | 3 | **41** | 4 | **66** | 1 | **91** | 4 |
| **17** | 2 | **42** | 1 | **67** | 3 | **92** | 2 |
| **18** | 2 | **43** | 3 | **68** | 2 | **93** | 4 |
| **19** | 4 | **44** | 2 | **69** | 3 | **94** | 3 |
| **20** | 1 | **45** | 3 | **70** | 2 | **95** | 1 |
| **21** | 4 | **46** | 1 | **71** | 1 | **96** | 2 |
| **22** | 1 | **47** | 4 | **72** | 3 | **97** | 2 |
| **23** | 4 | **48** | 3 | **73** | 2 | **98** | 3 |
| **24** | 1 | **49** | 3 | **74** | 3 | **99** | 4 |
| **25** | 4 | **50** | 1 | **75** | 4 | **100** | 1 |